
MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



बीड । प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्र मध्ये महिला वरील अन्य अत्याचार वाढलेले आहेत. महिला वरील होणारे अत्याचार याला आळा घालण्यासाठी नक्कीच पोलीस प्रशासनाने वेळोवेळी नेहमी दखल घेतलेली आहे. बीड जिल्हा पोलीस दलाने तर अशा घटनांना वेळोवेळी न्याय मिळवून दिलेला अनेक प्रकरणातून निदर्शनास आलेले आहे. अशातच झालेल्या एका मनोरुग्ण पिढीतील काही तरुणांनी बलात्कार केला होता. त्या पिढीतला न्याय मिळवून देण्यासाठी कोणीही पुढे येताना दिसून येत नव्हते. अशावेळी दैनिक महाराष्ट्र आरंभ यांच्या सततच्या बातमीच्या पाठ पुरवठ्यामुळे व पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या कार्य तत्परतेमुळे या पीडित मनोरुग्ण मुलीला बीड जिल्हा पोलीस दलाने वेळीच आरोपींना बेड्या ठोकून न्याय मिळवून दिला आहे. पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी सदर प्रकरणाची दखल घेऊन संबंधित बेड बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मोदीराज यांना तात्काळ पाचारण करून पीडितेवर बलात्कार केलेल्या आरोपींना पकडण्यासाठी सापळा रचून भिडे ठोकल्या आहेत. यामुळे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर व बीड जिल्हा पोलीस दलाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.




बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३०२ | गुरूवार दि.२५ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -302 | THURSDAY DT. 25 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

दैनिक महाराष्ट्र आरंभच्या बातमीचा दणका

# पीडितेवर अत्याचार करणाऱ्या नराधम आरोपींना पेठ बीड पोलिसांनी ठोकल्या बेड्या!

## अल्पवयीन पीडित मुलीस पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्यामुळे मिळाला न्याय; आरोपींना ठोकल्या बेड्या.




**दैनिक महाराष्ट्र आरंभच्या दणक्याने दणक्याने सुट्टीवर गेलेले पि आय अशोक मुदिराज यांना परत यावं लागलं.मानवी हक्क अभियान महाराष्ट्र नवनिर्माण सेना ऑल इंडिया पँथर चे मोठे योगदान दैनिक आरंभला खूप मोठी झाली मदत पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांनी आपले चक्र फिरविताच पेड बीड पोलीस स्टेशनचे अशोक मुदीराज, एपीआय उबाळे सह सुभाष मोटे, नितेश माने, बालाजी बाष्टेवाड, अजित शीकतोडे ,कर्तव्यदक्ष कारवाई. १८ जुलै रोजी रात्री साडे अकराच्या दरम्यान पीडित मुलीवर झाला होता बलात्कार दैनिक महाराष्ट्र आरंभने वेळोवेळी बातम्या प्रसारित केल्याने प्रकरणाला फुठली वाचा.भीक मागून जगणाऱ्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या, पेठ बीड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी.**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष करण लोंढे यांनी शेवटपर्यंत पाठपुरावा केला आहे कारण लोंढे यांनी संबंधित यांना विचारणा करून महाराष्ट्र आरंभ यांनी शेवटपर्यंत पाठपुरावा केल्यामुळे संबंधित आरोपींना पकडण्यात पोलिसांना खूप कसरत करावी लागली आहे.**

**ऑल इंडिया पँथर सेनेचे दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या बातमीचा पाठपुरावा करत असताना दीपक भाई केदार यांनीही पोलिसाची नंदकुमार ठाकूर यांच्याशी चर्चा करून पोलीस प्रशासनाला या संदर्भात विचार करून या प्रकरणांमध्ये शेवटपर्यंत साथ दिली.**

**मानवी हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मिलिंद आव्हाड यांनी या प्रकरणांमध्ये पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर महिला आयोगाचे अध्यक्ष चाकणकर यांना संपर्क करून संबंधित प्रकरणामध्ये कारवाई करण्यासाठी मागणी केली होती यावेळी मागणी यांनी या प्रकरणात आवाज उठवल्यामुळे संबंधित नाही मिळाला आहे मानवी यांच्याकडून दैनिक महाराष्ट्र आरंभच्या कार्याचे व बातमीचे कौतुक करण्यात आले आहे**

**पिढीतेस न्याय मिळवून देण्यासाठी अन्याय अत्याचार याला वाचा फोडणारे महाराष्ट्र न्यूज टाईम चे रोहित दीक्षित. ज्येष्ठ पत्रकार उत्तम ओव्हाळ, डॉ. मिलिंद आवाड इंडिया पेंटर सेनेचे दीपक केदार मनसेचे करण लोंढे दैनिक महाराष्ट्र आरंभ यांनी बातम्या प्रसारित केल्याने पोलीस यंत्रणेने घेतली तात्काळ दखल.पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी सुभाष मोठे यांचे आरोपी पकडण्यात मोठे योगदान.पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज एपीआय उबाळे व सुभाष मोटे पोलीस कर्मचारी यांच्या यंत्रणेला दैनिक महाराष्ट्र आरंभचा सलाम महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शहराध्यक्ष करण लोंढे रात्र जागून काढली पोलीस स्टेशनमध्ये दीड ते साठी झटणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी यांनी दिला होता आंदोलनाचा इशारा.**

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाकापर्यंतचे सिसीटीवी फुटेज मध्ये नाराधम आरोपी मनोरुग्ण बोळसर मुलीला मोटरसायकलवर बसून घेऊन जात असल्याचे दिसल्याने आरोपी शोधण्यास पेठ बीड पोलिसांचे यश. दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या वेळोवेळी प्रसारित केलेल्या बातमीच्या पाटलागामुळे मुळे बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने वेळीच दखल घेऊन अल्पवयीन पीडित न्याय मिळवून दिला आहे यामुळे बीड जिल्हा पोलीस दलावरती जिल्ह्यातील नागरिकांतून पोलिसांवरील विश्वास वाढलेला दिसून येत आहे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या कार्य तत्परतेने बीड जिल्ह्यातील वाढलेल्या महिला वरील अन्याय अत्याचाराला या कारवाईमुळे नक्कीच गुन्हेगारावर पोलिसांची वचक राहणार हे नक्की

संबंधित पिढी ते वरती अत्याचार झाल्याच्या नंतर दैनिक महाराष्ट्र आरंभाने पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याशी फोनवरती संपर्क केला असताना नंदकुमार ठाकूर साहेब यांनी नक्कीच नराधमांना आरोपींना अटक केली जाईल योग्य तो तपास केला जाईल अशी आश्वासन दिले होते ते आश्वासन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी पूर्ण करून पोलीस यंत्रणेचा पुरेपूर मार्गदर्शन करत सीसीटीव्ही फुटेच्या माध्यमातून पोलिसांनी या ठिकाणी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर बीडचे डीवायएसपी विश्वंभर गोरडे यांचे नेतृत्वाखाली पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मंदिरात एपीआय नित्यानंद उबाळे पोलीस कर्मचारी सुभाष मोठे अजिनाथ शिकतोडे नितेश माने पोलीस शिपाई बालाजी बास्ठेवाड, यांनी पेठ बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सीसीटीव्ही छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका परिसरातील तपासणी करून वेळोवेळी आपल्याकडे मार्फत माहिती घेऊन संबंधित आरोपींना पेठ बीड मधील मोमीनपुरा व बार्शी नाका भागातून दोन आरोपींना अटक केली आहे तिसऱ्या आरोपीचे नाव निष्पन्न झाले आहे संबंधित आरोपी यांना बीड पोलिसांनी बेड्या ठोकले आहेत आरोपींचे नाव हे निष्पन्न झाले आहेत इमरान खलील शहा रा.वय ३५ वर्षे, आस्फियान खलील मोमीन रा.मोमीनपुरा, बीड वय ३० वर्षे राहणार बार्शी नाका. या आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकले आहेत.


विशाळगड हिंसाचाराच्या निषेधार्थ मुस्लिम समाज रस्त्यावर


पोलीस कॉन्स्टेबल उगले तुम्हीच सांगा मनोरुग्ण अत्याचार ग्रस्त मुली जवळ सॅनिटरी पॅड कुठून आले

पेठ बीड पोलीस आणि बाल हक्क समिती यांनी मुलीची २४ तासाच्या आत वैद्यकीय तपासणी का केली नाही?

उगलेंची चौकशी पोलीस अधीक्षक यांच्या समक्ष व मिडियासमोर व्हायला हवी?


अशोक मुदिराज यांना माहिती विचारा पोलीस कर्मचारी उगले सांगतो आरोपींचे नावपेठ बीडचे पिआय अशोक मुदिराज यांना माहित आहेत.? पीडित भोळसर मुलीने अत्याचार झालेला पॅड बीड पोलिसांना सांगितल्यानंतर सुद्धा गुन्हा दाखल का केला नाही.? पेठ बीड पोलिसांनी जिव्हाळा केंद्र नवी भाजी मंडई येथे त्या मुलीला कोणाच्या परवानगीने ठेवले जिव्हाळा केंद्राशी कोणती परवानगी घेतली होती का कागदपत्रे व्यवहार पेठ पोलीस स्टेशन ने केला होता का.?

एस पी नंदकुमार ठाकूर साहेब भोळसर मुलीवर अत्याचार प्रकरणातील आरोपींना सोडून देणाऱ्या

पेठ बीड पोलीस स्टेशनचे पीआय अशोक मुदिराज पोलीस कर्मचारी उगले ला तात्काळ निलंबित करा?

# जायकवाडी येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेची स्थापना

माजलगाव । प्रतिनिधी

दिनांक २३ जुलै २०२४ रोजी जायकोवाडी तालुका माजलगाव जिल्हा बीड येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेचे उद्घाटन आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश जी घोडे व अखिल बिल्डर यांच्या हस्ते पाच वाजता करण्यात आले याप्रसंगी बोलताना राजेश घोडे म्हणाले की तुम्ही जो शाखेचा बोर्ड लावला आहे हा फक्त बोर्ड नसून ही एक विचारधारा आहे ही विचारधारा म्हणजे देशामध्ये सामाजिक आर्थिक व राजकीय विषमता आहे या सर्व विषमता जाळण्यासाठी आझाद क्रांती सेना इथून पुढे काम करणार आहे १८ पगड जाती समूहाला सोबत घेऊन गावाकुसा बाहेरील माणसांचे प्रश्न आझाद क्रांती सेना गल्लीपासून ते दिल्लीच्या तक्तापर्यंत पोहोचवण्याचं काम भविष्यात करणार आहे व सर्वसामान्यांना न्याय



हक्क मिळवून देण्यासाठी इथल्या व्यवस्थेशी कायम झगडत राहणार आहे यासाठी हा विचार आज आपल्या गावामध्ये आलेला आहे तो विचार आपण गावागावांमध्ये घेऊन जाण्याचं काम करावं असं या प्रसन्न बोलताना राजेश घोडे म्हणाले शाखाध्यक्ष संजय हिवाळे, उपाध्यक्ष अरुण पिसुळे, सचिव करण थोरात, व सल्लागार वसंत थोरात यांनी गावच्या प्रश्नांची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावरती घेतली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बळी थोरात, सुरेश थोरात, सुरेश पिसुळे, उमेश थोरात, राहुल थोरात, विशाल थोरात लक्ष्मण थोरात, विलास थोरात, भारत गायकवाड, नवनाथ लोंढे ,अमोल पिसुळे, अर्जुन थोरात परमेश्वर थोरात बंडू थोरात राजेश शेवाळे मदन थोरात रोहिदास शेवाळे अजय थोरात कृष्ण थोरात करण थोरात आदिने परिश्रम घेतले



मातंग समाजाचा आधारवड, शिक्षण महर्षी, माजी मंत्री महाराष्ट्र राज्य, मा.प्रा लक्ष्मणजी ढोबळे साहेब.यांच्या विचारावर प्रेरित होऊन, लातूर येथे संवाद मेळावा अभियानदौराचालू असताना. ड.कोमल ताई साळुंखे -ढोबळे प्रदेशाध्यक्ष बहुजन रयत परिषद.यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज विनोद दादा हातागळे. यांची.बिड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी. आशोक जाधव साहेब. प्रदेश उपाध्यक्ष. बहुजन रयत परिषद.व समाजातील सर्व मान्यवर उपस्थित होते.धन्यवाद...

# ज्येष्ठ नेत्या माजी आ. उषाताई दराडे,बीड नगरपरिषद विरुद्ध आक्रमक

**आज दिनांक २४ जुलै बुधवार रोजी, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते तथा लोकप्रिय समाजसेवक, श्री नितीनजी जायभाये, पेठ बीड इस्लामपुरा भागातील लोकप्रिय समाजसेवक फैयाज सय्यद इक्बालभाई यांच्या समवेत बीड शहरातील विविध भागातील अनेक नागरिक राष्ट्रवादी काँग्रेस आ. शरदचंद्र पवार गटाच्या ज्येष्ठ नेत्या माजी आमदार उषाताई दराडे यांच्या नेतृत्वाखाली**

नगरपालिकेच्या अकार्यक्षमपनाच्या च्या विरुद्ध आक्रमक झाले. यावेळी माजी आमदार उषाताई दराडे यांनी नगरपालिकेच्या मुख्याध्यापिकारी यांच्यासहित सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचा जोरदार समाचार घेतला. यावेळी उषाताई यांनी, बीड शहरामध्ये वाढलेले घाणीचे साम्राज्य, कचऱ्यांचे ढिगारे, त्यापासून निर्माण होणारी दुर्गंधी व डेंग्यू मलेरिया सुदृश्य साथीचे चे रोग, जागोजागी तुंबलेल्या नाल्या, रोग प्रतिबंधात्मक औषध फवारणीचा झालेला कायम अभाव, शहरातील अनेक भागांमध्ये बंद पडलेल्या पथदिव्यांमुळे झालेला अंधार , पथदिवे दुरुस्तीसाठी लागणाऱ्या



विद्युत साहित्याचा कायम तुटवडा , अनेक भागांमध्ये रस्ते नसल्यामुळे भर पावसाळ्यात नागरिकांचे होणारे हाल या सर्व शहरातील नागरिकांच्या समस्येंवर प्रश्न विचारले व चर्चा केली. यावेळी बीड शहरात आल्यापासून नेहमीच वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी उत्तरे देण्याचा प्रयत्न केला . परंतु त्यांच्या उत्तरांनी मी समाधानी झाले नाही असे उषाताईंनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. तरी पुढील काळात समाधानकारक कामे झाली नाहीत तर मी तीव्र आंदोलनाचा पवित्रा स्वीकारून पुढील पावले उचलेन असा इशारा उषाताई यांनी माध्यमांशी बोलताना दिला. यावेळी शहरातील अनेक भागांमधून आलेल्या नागरिकांचयावेळी शहरातील अनेक भागांमधून आलेल्या नागरिकांच्या वतीने ज्येष्ठ नेत्या माजी आमदार उषाताई दराडे यांनी विविध मागण्यांचे निवेदन नगरपरिषद मुख्याधिकारी यांना सुपूर्द केले व तात्काळ सर्व कामे मार्गी लागावीत अशी मागणी सर्वांच्या वतीने करण्यात आली. यावेळी शहरातील विविध भागातील महिला बांधव जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माय-लेकी, सासू-सूना, जावा-जावांनी धरला एकत्रित ठेका

## बीडमध्ये तेजस्वीनी ग्रुपचा पुढाकार : पंछी बनू उडती फिरू मस्त गगन में कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड। प्रतिनिधी

एरव्ही काही घरांमध्ये सासू-सूना, जावा-जावांमध्ये धुसफूस सुरू असते. कोणत्या ना कोणत्या कारणांवरून किरकोळ, मोठे वाद होत असतात. परंतू बीडमधील तेजस्वीनी ग्रुपने महिलांसाठी हक्काचे व्यासपिठ उभा करून देत एक वेगळा कार्यक्रम आयोजित केला. यामध्ये सासू-सूना, जावा-जावा, माय-लेकींनी एकत्रित नृत्य करत उपस्थितांची मने जिंकली. अध्यक्षा सोनल पाटील यांनी या पंछी बनू उडती फिरू मस्त गगन में हा कार्यक्रम मंगळवारी बीड शहरातील रामकृष्ण मंगल कार्यालयात आयोजित केला होता. यामध्ये हिंदी, मराठी गाण्यांवर महिलांनी चांगलाच ठेका धरला.

बीड मधील महिलांच्या अंगी कला आहेत. परंतू त्यांना हक्काचे व्यासपिठ मिळत नाही. त्यामुळे अंगी असलेली कला मनात दडवून ठेवावी लागते. परंतू महिलांच्या मनातील भावना समजून बीडमधील तेजस्वीनी ग्रुपच्या अध्यक्षा सोनल अरविंद पाटील यांनी खास महिलांसाठी सोलो आणि जोडी नृत्य स्पर्धांचे २३ जूलै रोजी आयोजन केले होते. यामध्ये सोलो नृत्यात १८ वर्षांवरील मुली, महिला सहभागी झाल्या होत्या तर तर जोडी तुझी माझी यामध्ये मैत्रिणी, जावा-जावा, सासू-सुना, आई-मुलगी, नणंद-भावजाई असे सहभागी झाले होते. या महिलांनी हिंदी, मराठी गाण्यांवर एकापेक्षा एक अशा बहारदार नृत्य करून उपस्थितांची वाहवा मिळवली. या कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्षा डॉ.दीपा क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर परिक्षक म्हणून गौतम कांबळे, सोनल नहार यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रासंचालन डॉ.दुष्यंता रामटेके यांनी केले. कार्यक्रमासाठी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

स्पर्धा संपल्यानंतर लगेचच निकाल जाहिर करण्यात आला. यामध्ये सोलो प्रकारात अश्विनी जाधव यांनी प्रथम तर नेहा शिंदे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच जोडी नृत्यात




डॉ.सायली उन्हाळे आणि पहल जाजू यांनी प्रथम तर अर्चना कासट आणि पूजा सारडा यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या सर्वांना मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. तसेच इतर सहभागी स्पर्धक महिलांनाही मानचिन्ह देण्यात आले.

कार्यक्रम कौतुकास्पद - डॉ. दीपा क्षीरसागर

सोनल पाटील यांनी तेजस्विनी ग्रुपच्या माध्यमातून महिलांना हक्काचे व्यासपिठ उपलब्ध करून दिले आहे. त्यांची कायम धडपड सुरू असते. त्याला महिलांनी अशाप्रकारे उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने यशही येत आहे. असे कार्यक्रम महिलांसाठी व्हायला हवेत. या कार्यक्रमाचे नाव पंछी बनू उडती फिरू मस्त गगन में हे खुपच लक्षवेधक आहे. यातून खुप काही शिकता येते. सोनल पाटील यांचे आणि तेजस्विनी ग्रुपचे खरोखरच कौतुक करावे तेवढे कमीच आहे, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्षा डॉ.दीपा क्षीरसार यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केल्यानंतर सर्व स्पर्धक महिलांना शुभेच्छा दिल्या.

### यापुढेही आणखी कार्यक्रम घेणार - सोनल पाटील

महिलांसाठी काही तरी करण्याची इच्छा असते. त्यामुळेच तेजस्विनी ग्रुप तयार केला. या आगोदर विविध प्रदर्शन भरवून महिला उद्योजकांना व्यासपिठ दिले. आता सांस्कृतिक कार्यक्रमांची मागणी होत असल्याने पंछी बनू उडती फिरू मस्त गगन में हा कार्यक्रम घेण्याचा विचार आला. याला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने आनंदी आहे. पुढील काळात यापेक्षाही मोठे कार्यक्रम घेतले जातील. महिलांनीही त्यांच्याकडील संकल्पना मला सांगाव्यात, असे तेजस्विनी ग्रुपच्या अध्यक्षा सोनल अरविंद पाटील यांनी बोलताना सांगितले.

# लोकमान्य लोकनेत्या

**● प्रदीप कुलकर्णी ●**

महाराष्ट्राच्या राजकारणात 'मुंडे' नावाचा जो आज दबदबा आहे तो केवळ लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यामुळे..आणि त्यांच्यानंतर हा दबदबा असाच पुढे टिकून राहिलाय तो 'ताईसाहेब' अर्थात पंकजाताई यांच्यामुळेच..हे त्रिवार सत्य आहे. पंकजाताईंची राजकीय ताकद, आक्रमक शैली, सर्वांना सोबत घेऊन जाणारं त्यांचं नेतृत्व, समाजाच्या सर्व स्तरातील लोकांचा असणारा मोठा पाठिंबा आणि वंचित, पिडित घटकांसाठी काम करण्याची त्यांची तळमळ याची प्रचिती महाराष्ट्राला वारंवार आलेली आहे येत आहे. स्वाभिमानी आणि कणखर बाणा यामुळे राजकारणात त्यांची एक वेगळी छाप आहे. निवडणूक म्हटलं की जय-पराजय असतो पण बीडच्या निवडणुकीत त्यांचा झालेला निसटता पराभव सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या मनाला इतका जिव्हारी लागला की, आत्महत्येसारख्या घटना घडल्या. हे असं एखाद्या राजकीय नेत्याच्या बाबतीत क्वचितच घडलं असेल. महाराष्ट्राच्या राजकारणात असं यापूर्वी कधी झाला नसावं. आपल्या लाडक्या नेत्याच्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी स्वतःच्या जीवाचं बरं-वाईट करणं ही तशी वेदनादायक आणि मनाला चटका लावणारी गोष्ट..पण यातून एखाद्या नेत्यांवर सामान्य माणूस किती जीवापाड प्रेम करतो हे ही दिसून येतं, पंकजाताईंच्या बाबतीत देखील असंच झालं. केवढ हे प्रेम..! पंकजाताईंच्या मागे असणारी जनशक्ती किती प्रचंड आहे, हे सत्ता अथवा कोणतही संवैधानिक पद नसताना शिवशक्ती परिक्रमा असो की दसरा मेळावा यात वेळोवेळी दिसून आलेलं आहे. लोकसभेत झालेल्या पराभवानंतर पंकजाताईंना दुर्लक्षित करून चालणार नाही हे लक्षात आल्यानं भारतीय जनता



पक्षानं त्यांना विधानपरिषदेवर संधी दिली आणि त्या आमदार म्हणून विजयी झाल्या. या विजयाने राज्यातील लाखो, करोडो कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा एकदा नवचैतन्य निर्माण झाले. कोण आली रे कोण आली, महाराष्ट्राची वाघीण आली या गर्जनेने महाराष्ट्राचं विधानभवन त्यादिवशी अक्षरशः दणाणून गेलं. लोकसभेतील पराभवानंतर पंकजाताई खचून गेल्या नाहीत, पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागल्या. 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही' या ध्येयाने महाराष्ट्राची ही वाघीण पुन्हा मैदानात उतरली आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

पंकजाताई मुंडे यांची राजकीय कारकीर्द सुरवातीपासून तशी संघर्षाचीच.. तरीही त्यावर स्वकर्तृत्वाने मात करत मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला. एक सरळमार्गी राजकारणी, जनतेच्या अडी- अडचणीला धावून जात त्यांच्या वेदना समजून घेण्याचं काम त्यांनी सातत्यानं केलं. महाराष्ट्रातील लाखो- करोडो कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी अन् प्रेमाची भावना आहे, हिच शक्ती त्यांना उर्जा देऊन जाते. पंकजाताई कधी कोणाचं वाईट चिंतणार नाहीत की करणार नाहीत, त्या त्रास सहन करणाऱ्या पैकी आहेत, देणाऱ्या पैकी मुळीच नाहीत, ही भावना, हा आदर आज त्यांच्याविषयी सामान्य कार्यकर्त्यांमध्ये आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी कोणाची हुजरेगिरी करणे, झुकणे त्यांच्या रक्तात नाही तथापि राजकारणात वरिष्ठांचा आदर ठेवण्याचे संस्कार त्या कधी विसरल्या नाहीत.

राजकारणात काम करत असताना जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये, याची काळजी त्या सतत घेत असतात. हीच काळजी त्यांच्यात सामान्य माणसांविषयी असलेली तळमळ दाखवून देते. सत्तेच्या काळात मंत्री म्हणून त्यांचे काम उल्लेखनीय असंच होतं, आपल्या खात्याच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ तर त्यांनी गोरगरिबांपर्यंत पोहोचविलाच परंतु त्याचबरोबर अनेक नव नवीन योजना अंमलात आणून लोक कल्याणाची एक अनोखी संकल्पना रूजविली. मध्यप्रदेशात सह प्रभारी म्हणून काम करीत असताना तिथल्या भाजप सरकारने राबविलेली 'लाडली बहना' योजना त्यांच्या आग्रहामुळे महाराष्ट्र सरकारने इथेही अंमलात आणली, हे त्यांच्यात असलेल्या लोकनेत्याचं उत्तम उदाहरण म्हणावं लागेल.

सत्तेच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी उपक्रम राबवल्याने त्यांना अफाट लोकप्रियता मिळाली, ज्यामुळं अनेकांची पोटं दुखली, त्यांच्या विरोधात कट कारस्थानही रचली गेली पण, प्रत्येक 'विजयात संघर्ष' आणि प्रत्येक 'संघर्षात विजय' या लोकनेत्याच्या समीकरणाची शिकवण व संस्काराच्या शिदोरीवर त्यांनी इथेही विजय मिळवला. वंचित, शोषित, बहुजनांच्या हितासाठी मुंडे साहेबांचा वसा घेऊन सुरु झालेला त्यांचा राजकीय प्रवास रोखण्याचा निष्फळ प्रयत्न अनेकांनी केला, परंतु संघर्षाची शिकवण व जनसामान्यांचे असीम पाठबळ लाभल्याने त्यांना रोखणं कुणालाही शक्य झालं नाही.

मोठया माणसांचा वारसा चालवणं हे तसं एक आव्हानच असतं, ते पेलणं सर्वानाच शक्य होत असं नाही पण पंकजाताई मात्र याला अपवाद आहेत. मुंडे साहेबांचा वारसा होणं म्हणजे त्यांच्या सत्ता, संपतीचा वारसा होणं नाही, तर त्यांच्या आदर्श विचारांचा..वंचित, पिडित, शोषित, दीनदुबळ्यांची सेवा करण्याचा.. आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा वारसा चालवणं..जे काम पंकजाताई आपल्या राजकीय जीवनात अव्याहतपणे करत आल्या आहेत. सामाजिक बांधिलकी जोपासताना 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही ' हे त्यांनी केवळ बोलून नव्हे तर आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. पद, सत्ता असो वा नसो मुंडे साहेबांचा माणसं जोडण्याचा सक्षम वारसा त्यांनी कायम जपला. आपल्या कामांतून त्यांनी वंचित, उपेक्षित घटकांची सेवा करून त्यांचे आशीर्वाद घेतले. समाजातील जातीभेद झूगारून एक माणूस म्हणून विविध घटकांना आपुलकीने जोडण्याचे काम त्या करत आहेत. सामान्य माणसासाठी अहोरात्र काम करण्याच्या स्वभावामुळे आलेल्या प्रत्येक संकटावर मात करत लोकनेत्याचा खरा वारसा त्या आज पुढे नेत आहेत. लोकांना त्यांच्या रूपात मुंडे साहेबच दिसतात, त्यांच्यावर येणारा प्रत्येक वार स्वतःच्या अंगावर घेण्यासाठी कार्यकर्ते सदैव तयार असतात. 'गोपीनाथ मुंडे हे नांव जगाला विसरू देणार नाही', अशी शपथ घेणारे त्यांचे स्वाभिमानी नेतृत्व संघर्षाच्या अग्निदिव्यातून बाहेर पडून पुन्हा तितक्याच रूबाबात आणि आत्मविश्वासाने वाटचाल करेल, यात तीळमात्र शंका नाही. परमेश्वर त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य प्रदान करो, त्यांच्या हातून जनसामान्यांची सेवा सतत होत राहो..याच आजच्या वाढदिवशी मनःपूर्वक शुभेच्छा..!

# समर्थकांच्या आत्महत्येने व्यथित

## वाढदिवस साजरा करणार नाही, हारतुरे नको फक्त शुभेच्छांचा एक एसएमएस करा

### पंकजाताई मुंडे यांचे राज्यभरातील कार्यकर्त्यांना आवाहन
### २९ जुलैला बीड जिल्ह्यात येणार ; भगवान भक्तीगड ते परळी महापुरुषांना करणार वंदन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**२६ जुलै रोजी आपला वाढदिवस असून संपूर्ण राज्यातून वाढदिवसाच्या दिवशी ताई तुम्ही कुठे भेटणार? अशा प्रकारचे संदेश मिळत आहेत, तथापि, हारतुरे , सत्कार, बडेजाव असा कोणताही उत्सवी स्वरूपात वाढदिवस साजरा करणे हे सद्य परिस्थितीत समर्पक वाटत नाही, त्यामुळे केवळ आपल्या प्रेमरुपी एका एसएमएस वर वाढदिवसाच्या शुभेच्छा व आशीर्वाद प्रदान मला द्यावेत असे आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी राज्यभरातील कार्यकर्त्यांना केलं आहे. दरम्यान, विधानपरिषदेवर आमदार म्हणून निवडून आल्यानंतर पंकजाताई मुंडे यांनी येत्या २९ तारखेला भगवानभक्ती गडापासून परळीपर्यंत आपण महापुरुषांना वंदन करत दौरा करणार असल्याचे सांगितले आहे. वाढदिवसा दिवशी सर्वांनी आहे त्या ठिकाणावरून केवळ एसएमएसवरुन शुभेच्छा द्याव्यात असेही त्यांनी म्हटले आहे.**



पंकजाताई मुंडे यांनी वाढदिवसाच्या अनुषंगाने आपल्या समर्थकांना आवाहन करणारा एक व्हिडिओ प्रसारित केला असून या व्हिडिओमध्ये त्यांनी सर्वांना विनंतीवजा आवाहन केले आहे. त्या म्हणाल्या, माझा वाढदिवस उत्सवी स्वरूपात साजरा करावा हे मला कधीच पटलेले नाही, त्याचबरोबर शिवशक्ती परिक्रमा असो की अन्य सर्व वेळी आपण भरभरून माझे कौतुक करतच असता. यावेळी परिस्थिती वेगळी आहे. आपल्या काही बांधवांनी आत्महत्या केल्याच्या घटना या अतिशय वेदनादायी आहेत. या पार्श्वभूमीवर माझा वाढदिवस उत्सवी स्वरूपात साजरा करणे माझ्या मनाला न पटणारे आहे. त्यामुळे मी वाढदिवसाचे निमित्ताने हार तुरे सत्कार असे काहीही स्वीकारणार नाही. कार्यकर्त्यांनी कुठलाही बडेजाव करू नये तसेच वाढदिवशी भेटायला येण्याचे टाळावे. वाढदिवसाचे उत्सवी स्वरूप टाळून माझा मान राखावा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

**२९ जुलैला बीड जिल्ह्यात ; महापुरुषांना करणार वंदन**

दरम्यान, विधानपरिषदेवर आमदार म्हणून निवडून आल्यानंतर पंकजाताई मुंडे येत्या सोमवारी २९ जुलै रोजी बीड जिल्ह्यात येत आहेत. स्वतःचा सत्कार न घेता जिल्हयातील विविध ठिकाणी महापुरुषांना त्या वंदन करणार आहेत. राष्ट्रसंत भगवानबाबा यांची जन्मभूमी असलेल्या भगवान भक्तीगडावर पुष्पवृष्टी व संत भगवान बाबांचे दर्शन घेऊन हा दौरा सुरू करणार आहोत. भगवान भक्ती गडानंतर श्रीक्षेत्र नारायणगड त्यानंतर बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन करणार आहेत. त्यानंतर गोपीनाथ गडावर जाऊन लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन, परळी येथे महामानव डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. या दौऱ्यात आपण कोणतीही हार तुरे स्वीकारणार नसून केवळ पुष्पहार हे महापुरुषांना अर्पण करणार आहोत. त्यामुळे या दौऱ्यातही माझ्यासाठी कोणीही हार तुरे आणू नयेत असे आवाहनही पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

## राष्ट्रीय समाज पक्ष बीड जिल्हाध्यक्ष प्रा. अण्णासाहेब मतकर यांची पक्षनिरीक्षक पदी निवड

बीड । प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रीय समाज पक्षाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत बीड जिल्हा अध्यक्ष प्राध्यापक अण्णासाहेब मतकर यांची गेवराई विधानसभा निरीक्षक पदी निवड करण्यात आली आहे रासप चे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय महादेवजी जानकर साहेब यांच्या आदेशानुसार गेवराई मतदार संघाची चाचणी करण्यासाठी पक्ष निरीक्षक म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते व मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर यांच्या उपस्थितीत राज्यातील जिल्हास्तरीय प्रमुख पदाधिकारी मुंबईत बैठक पार पडली आहे या बैठकीत रासपचे बीड जिल्हा अध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांच्या राजकीय दृष्ट्या सामाजिक दृष्ट्या बहुचर्चित असलेल्या गेवराई मतदार संघात पक्षनिरीक्षक म्हणून पक्षाकडून पत्रकाद्वारे नियुक्ती करण्यात आली



राष्ट्रीय समाज पक्षाकडून महाराष्ट्रातील १०९ विधानसभा मतदारसंघात चाचणी करण्यात आली यामध्ये गेवराई मतदार संघाचा देखील समावेश आहे या सर्व विधानसभा मतदारसंघात बहुजन समाजासोबत घेऊन ताकदीने निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे बीड जिल्हा अध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी सांगितले गेवराई मतदार संघाच्या पक्ष निरीक्षक पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्व तालुक्यातून अभिनंदन होत आहे.



जि प शाळा सिरसमार्ग येथे चंद्रकांत मेंडके सर यांची नियुक्ती झाल्या बद्दल सिरसमार्ग ग्रामस्त कडून सत्कार करण्यात आला,या वेळी केंद्र प्रमुख दहीवाळ सर व सिरसमार्गचे युवक उपस्थीत होते

## घाट नागनाथ मंदीरा जवळील धबधबा वाहू लागला

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

थोडया थोडक्या पडलेल्या पावसामुळे निसर्ग संपदेने नटलेल्या बुट्टेनाथ,घाट नागनाथ डोंगर दऱ्याच्या भागातील विविधता तसेच पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्य पर्यटकांना भुरळ घालत आहे.वृक्ष, जमीन,निसर्ग,नैसार्गिक संपत्ती या विषयी आंतरिक जिव्हाळा निर्माण झाला पाहीजे या साठी निसर्गप्रेमी महिला, युवती यांनी नाग रिक निसर्गाशी मैत्री केली असल्याने पर्यटन स्थळांकडे गेल्या काही महिन्यांपासून युवक तसेच पर्यटकांचा ओढा मोठ्या प्रमाणात वाढला आहे.बुट्टेनाथ,घाट नागनाथ परिसरात सध्या म्हणावा तसा पाऊस नसतानाही उंच डोंगराहून खळखळत वाहत येणारे धबधबे फेसाळत वाहत आहेत. ओढे नाले भरून वाहत आहेत. या भागातील छोटद्या छोटद्या सांडवे, बंधाऱ्यातही पाणी भरले आहे. मध्यतंरी झालेल्या मुर पावसामुळे डोंगर हिरवेगार झालेले दिसत आहेत.



## स्तुती सुयोग कोटेचा वर्ल्ड अबॅकस टॉपर्स

### अबॅकस ज्ञान असोसिएशनच्या अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये स्तुती सुयोग कोटेचाने मिळवले सर्वोत्कृष्ट वर्ल्ड चॅम्पियन टॉपर्स मानद शिल्ड

किल्ले धारूर । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या मनाप्रमाणे विषयज्ञान देण्यात आल्यास अधिक आणि अधिक विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो. विविध स्पर्धेमधूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग असून विद्यार्थ्यांना मिळालेले यशाची प्रमाणपत्र भविष्यात उपयोगात यावेत म्हणून अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख श्री डॉ.घोडके ए एस यांनी प्रत्येक चॅम्पियनशिपचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांच्या भविष्यात उपयोग व्हावा अशाच जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावरील संघटनेमध्ये मानद सदस्य मिळवून विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिलेली आहे जी की सर्व स्तरा वरती मान्यताप्राप्त आहेत. जागतिक स्तरावरील ज्ञान असोसिएशनच्या अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये मास्टरस्तुती सुयोग कोटेचाने सर्वोत्कृष्ट टॉपर रँकिंग मिळवून ऐतिहासिक यश मिळवलेले आहे. शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. भारत देशाच्या २४ जून २०२४ निकाल जाहीर झालेल्या ज्ञान असोसिएशनच्या वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप मध्ये जगातील १३ देशांनी घेतलेल्या एकूण २००० विद्यार्थ्यांमध्ये भारत, यु अँड इ म्यानमार, इंटरनॅशनल स्तरावरील ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिप आणि आंतरराष्ट्रीय परिषदेत केरळ राज्यातील अबॅकस असोसिएशन



यांच्या सहकार्याने जागतिक स्तरावरील अबॅकस स्पर्धा स्पर्धांचा निकाल जाहीर झालेला असून त्यामध्ये स्तुती सुयोग कोटेचाने सर्वोत्कृष्ट जागतिक टॉपर्स शिल्ड मेडल प्रमाणपत्र मिळालेलं असून अबॅकसच्या किड्स लेवलवनच्या रॅक स्पर्धेमध्ये स्तुती सुयोग कोटेचाची जागतिक स्तरावर निवड झालेली आहे . बीडच्या सुपर जिनियस स्तुती सुयोग कोटेचाने सहभाग घेत उत्कृष्ट विजयी सर्वोत्कृष्ट बक्षीस आणि प्रमाणपत्र मिळविले असून इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न करत असल्यामुळे तिला यश मिळालेली आहे तसेच त्यांच्या पालकांनी, शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. अबॅकस तथा वैदिक गणित मार्गदर्शक डॉ.एस ए घोडके यांनी त्यांना सतत गणितामधील असलेल्या अडचणी दूर करण्यास प्रयत्न केलेले आहे. अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील स्तुती सुयोग कोटेचाचे हार्दिक अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. जागतिक स्तरावरील युनायटेड किंग्डम जागतिक अबॅकस चॅम्पियनशिप सप्टेंबर २०२४ स्तुती सुयोग कोटीच्याची अबॅकस ऑनलाइनची निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

अबॅकस आणि वैदिक मॅथमुळे विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे

## साडे ६ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेले कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उद्घाटनाच्या प्रतिक्षेत

### जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना निवेदन:- डॉ.गणेश ढवळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील सर्व सोयींनी युक्त प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य ईमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्च करण्यात आला असुन २ वर्षांपूर्वी बांधकाम पूर्ण झालेले आहे मात्र शासनाच्या लालफितीत आणि कंत्राटी कर्मचारी यांच्या अनागोंदी कारभारामुळे आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असुन शासनाच्या लालफितीच्या कारभारात प्रत्यक्ष आरोग्य सेवा अडकून पडली आहे.कुसळंब परीसरातील गोरगरीबांना आरोग्य सेवेपासुन वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे पाटोदा तालुक्यातील दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक प्राथमिक आरोग्य केंद्र तातडीने सुरू करण्यात यावे अन्यथा १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे आणि शेख युनुस च-हाटकर यांना दिले आहे.**



कुसळंबचे भुमिपुत्र विद्यमान आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकृष्ण पवार यांच्या अथक प्रयत्नानंतर तब्बल साडे ६ कोटी रुपये खर्चून कुसळंब येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य ईमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी सर्व सुविधांनी युक्त निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. डॉ.राधाकृष्ण पवार हे बीड जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी वाहली येथे मोडकळीस आलेले प्राथमिक आरोग्य केंद्र कुसळंब येथे स्थलांतरित करण्यासाठी प्रयत्न केला.वाहली आणि परीसरातील लोकांनी यास विरोध केला प्रकरण अगदी न्यायालयापर्यंत गेले.त्यानंतर डॉ.पवार यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लाऊन कुसळंब येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करून घेतले.आणि केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून त्यांनी त्यासाठी ६ कोटी ३१ लाख रुपयांचा निधी खेचून आणला.तसेच कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम होत असताना जातीने लक्ष घालून दर्जेदार काम होण्यासाठी कायम प्रयत्नशील राहिले. डॉ.पवार यांचे कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात मोलाचे योगदान आहे.

कुसळंब आणि दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी शासन पातळीवर प्रयत्न सुरू :- डॉ.उहास गंडाळ ( जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड) कुसळंब आणि दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. शासनातर्फे भरल्या जाणाऱ्या वैद्यकिय अधिकारी आणि आरोग्य सहाय्यकांची दोन पदे भरलेली आहेत.क्लार्क, एएनएम,, सफाई कामगार अशा स्वरुपाचा कर्मचारी वर्ग बाह्य स्त्रोताकडुन घ्यावयाचा आहे.हा कर्मचारी वर्ग भरण्यासाठी वरीष्ठ पातळीवरून प्रयत्न सुरू आहेत. लवकरात लवकर दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा पुरविण्यात येतील.



## स्टेट बँक ऑफ इंडियाचे सेवा प्रबंधक अशोक सावणे यांची बदली तर सेवा प्रबंधक पदी किशोर सर यांची नियुक्ती

किल्ले धारूर । प्रतिनिधी

स्टेट बैंक ऑफ इंडियाचे सेवा प्रबंधक अशोक सावणे यांची बदली झाली असून त्या निमीत्त त्यांना हृदयपूर्ण निरोप देण्यात आला अशोक सावणे यांचा किल्ले धारूर येथील स्टेट बँक ऑफ इंडियात तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला असून केंद्र सरकारच्या नियमाप्रमाणे त्यांची बदली झाली आहे.अशोक सावणे यांनी आपल्या तीन वर्षांच्या कार्यकाळात सामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर कामे केल्यामुळे त्यांची जनमाणसात चांगली प्रतिमा तयार झाली होती. तालुक्यातील ग्रामीण भागातून आलेल्या खातेधारकांच्या समस्या सोडविण्यासह ग्राहकांना समजून सांगण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती आपल्या तीन वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी कधीच अधिकारी पदाचा बडेजावपणा न मिरविता लोकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचे काम त्यांनी केले आहे आज त्यांची माजलगाव येथे बदली झाली असून व त्यांच्या जागी किशोर सर यांची नियुक्ती झाल्याने त्यांचा शाखा व्यवस्थापक निलेश वाडीया पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते अतीक मोमीन,फील्ड ऑफिसर राजू वानखेडे, अशोक भालेकर,शैलेश कोंगलवार,शांतनू गोखले,अभिजित माळी,रितेश चिद्रवार,अंकुश थोरात,आनंद चिद्रवार,मेजर विठ्ठल घुले,पठाण वाजेद,शेख नदीम,शेख समद यांनी सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हाधिकाऱ्यांना चार दिवस झाले आमरण उपोषण करणाऱ्या आंदोलनकर्त्यांचं उपोषण सोडायला वेळ नाही मोबाईल ही स्विच ऑफ : पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

तात्काळ बेकायदेशीर रित्या जाणून-बुजून आपल्या पदाचा गैरवापर करणाऱ्या अनुसूचित जातीतील व्यक्तींना टार्गेट करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे.

एकात्मिक बाल विकास प्रकल्प सेवा योजना बीड-१. यांच्यामार्फत सन २०२३ रोजी अंगणवाडी सेविका मदतनीस रिक्त पद भरती करण्यात आली. त्यामध्ये घाटसावळी येथील अंगणवाडी मदतनीस रिक्त पद भरती मध्ये बनावट कागदपत्र घेऊन, प्राथमिक यादीमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे जास्तीचे गुण देऊन उमेदवारास प्रथम क्रमांक देऊन, सिद्धी दादाभाई सूर्यवंशी यांची फसवणूक केलेली असून शासनाची देखील फसवणूक केलेली आहे. बनावट कागदपत्रा बाबत संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी सिद्धी दादाभाई सूर्यवंशी यांनी माहिती देऊन योग्य ती कारवाई करण्याबाबत विनंती अर्ज तक्रार केलेले आहे.

तरी देखील संबंधित अधिकाऱ्यांनी त्याविषयी कोणत्याही प्रकारची योग्य ती कारवाई न करून पद भरती स्थगित ठेवली आहे. यामध्ये संबंधित अधिकाऱ्याची आर्थिक देवाणघेवाण झाली असावी, याची शक्यता नाकारता येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्ज करण्यात आला असता, अर्ज घेण्यास नकार देण्यात आला. व अपमानास्पद वागणूक दिली.

पंचायत समिती बीड आवकजावक मधून माहिती अधिकाराचा अर्ज दाखल केला असता. हे त्यांना कळाले तेव्हा प्राथमिक यादी मधील प्रथम क्रमांकाच्या उमेदवाराला आमच्याबद्दल माहिती दिली. त्यामुळे उमेदवाराच्या पतीने आम्हाला घरी येऊन माहिती अधिकार मागे घेण्याची धमकी दिली व रस्त्यात गाड्या आडव्या लावून मारण्याचाही प्रयत्न केला दिपक तांगडे यांच्या जीवास धोका असून काही बरे वाईट झाल्यास याला पूर्णतः जबाबदार बाल विकास प्रकल्प अधिकारी असतील. त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून शासनाची देखील फसवणूक केलेली आहे. ही बाब त्यांच्या वरिष्ठ अधिकारी म्हणजेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांच्याही निदर्शनास आणून दिली. त्यांनीही या विषयांमध्ये दुर्लक्ष करून दिशाभूल करून कोणत्याही प्रकारे योग्य न्याय देण्यास प्रयत्न केला नाही. त्यांची देखील आर्थिक देवाणघेवाण झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

घाटजवळा अंगणवाडी सेविकेला बेकायदेशीर रित्या कोणत्याही प्रकारचा कायदेशीर राजीनामा देण्यात आलेला नसून, देखील बालविकास प्रकल्प अधिकारी व संबंधित गावातील सरपंच,ग्रामसेवक व प्रतिष्ठित ग्रामपंचायतील ठेकेदारांनी मिळून




आर्थिक पैशाची देवाणघेवाण करून जातीय द्वेषाने टार्गेट केले व अंगणवाडी सेविकेला कामावरून कमी केले. कारण १४ वित्त व १५ वित्त आयोगानुसार ग्रामपंचायत मध्ये जो निधी येतो. त्या निधीमधून काही टक्के भाग हा अंगणवाडी साठी खर्च करणे गरजेचे असते आणि घाटजवळा अंगणवाडी मध्ये कुठल्याच प्रकारची सोयी उपलब्ध नसल्यामुळे ई ग्राम स्वराज पोर्टलवर पाहणी केली. अंगणवाडीसाठी पैसे खर्च केले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे क्रांती शिंदे या अंगणवाडी सेविकेने सरपंच व ग्रामसेवक यांना विनंती करून अंगणवाडी साठी निधी खर्च करावा सांगितले, असता सरपंच व ग्रामसेवकांनी त्याकडे दुर्लक्ष केले म्हणून अंगणवाडी सेविकेने वेळोवेळी तक्रार करून अंगणवाडीमध्ये रंगरंगोटी करून घेतली,लाईट फिटिंग करून घेतली,टीव्ही बसून घेतला, टेबल खुर्च्या आणण्यात आल्या व अंगणवाडीसाठी शौचालयाची मागणी केली. सेविका अनुसूचित जातीतील महिला असल्यामुळे तिला त्यांनी सन्मानाची वागणूक दिली नाही व शौचालय बांधण्यात टाळाटाळ केली. कोणत्याही प्रकारचा विनंती अर्ज सरपंच व ग्रामसेवक घेत नाहीत. सरपंच घुमरे, ग्रामसेवक घुमरे, ग्रामपंचायतील काम करणारा ठेकेदारही घुमरे यांची भावकी असल्यामुळे ग्रामसेवक मागील दहा वर्षापासून घाटजवळा ग्रामपंचायत मध्ये कार्यरत आहे.

१.बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी परिवेक्षिकामार्फत लेक लाडकी योजनेसाठी प्रत्येक फॉर्म मागे शंभर रुपयाची मागणी केली. प्रत्येक फॉर्म मागे शंभर रुपये न दिल्यामुळे. एकही फॉर्म घेण्यात आलेला नाही.२.त्यांनी सांगितलेल्या शाखेमध्ये अकाउंट ओपन न केल्यामुळे काही वेळेस मानधन व जळतनासाठी येणारे पैसे अकाउंट वर ट्रान्सफर न करता चेक द्वारे देण्यात येते. जळतानाचे २०% रक्कम ही परिवेक्षिका मागणी करतात २०% रक्कम आपण देत नाही. ३.जुने मोबाईल घेऊन नवीन मोबाईल देण्यात आले. नवीन मोबाईलची पावती पोहोच आमच्याकडून घेण्यात आली त्यामुळे अंगणवाडी कार्यकर्तीने देखील जुन्या मोबाईलची पोच मागितली असता ती देण्यात आलेली नाही.

४.बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी अंगणवाडी सेविकांना हलक्या प्रतीच्या जबरदस्तीने साड्या घेण्यास भाग पाडले व त्यासाठी १६०० रुपयाची जबरदस्तीने वसुली केली ती साडी घेण्यास सेविकेने नकार दिला व सोळाशे रुपये देण्यासही नकार दिला. याविषयी माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार याची माहिती मागविले असता बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी माहिती अधिकार घेण्यास नकार दिला.

याचा राग मनात ठेवून सरपंच, ग्रामसेवक,ग्रामपंचायत,ठेकेदार, गावातील यांचे नाते संबंधी,सन २०२२ मध्ये जी यादी लावण्यात आली होती त्या यादी तील दोन नंबरचे उमेदवार, त्यांचे नातेवाईक व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी सगळ्यांनी मिळून प्लॅन करून क्रांती शिंदे यांना टार्गेट करून बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी क्रांती शिंदे यांना घाटजवळा अंगणवाडीतून अंगणवाडी सेविका पदावरून कमी करण्यात आले.

वरील दोन्ही विषयांमध्ये तात्काळ सखोल चौकशी व्हावी.योग्य त्या व्यक्तीला नियुक्ती पत्र द्यावे. क्रांती शिंदे या महिलेला तात्काळ घाटजवळा अंगणवाडी मध्ये अंगणवाडी सेविका पदावर रुजू करून घ्यावे. व यामध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ या विषयाची चौकशी करा. प्रकरणी संबंधित अधिकारी यांच्या वर योग्य ती कारवाई करण्यात यावी व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे. अशी ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी आहे अन्यथा आंदोलनकर्ते जिल्हाधिकारी यांच्या गाडीला आडवं झोपुन न्याय घेतल्याशिवाय स्वस्त बसणार नाहीत.

# शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा या राष्ट्रीय मार्गाचे काम तीन महिन्यात पुर्ण होणार

## साकेतच्या कंत्राटदारांशी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागरांची चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

**शिरापुर धुमाळ ते जरूड फाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असुन हे काम सध्या ४० टक्के झाले आहे. उर्वरित काम ३ महिन्यात पुर्ण करण्याचे नियोजन असुन या कामात महावितरणचे पोलशिफ्टींग,नवीन विद्युत लाईन टाकण्याचे काम सुरू असुन बीड शहरात काही भागात रस्त्यालगत नळ योजनेचे पाईप स्थलांतरीत करण्याचे काम होत आहे. शहरातून जाणारा हा रस्ता लवकर पुर्ण करण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करत असल्याचे साकेत कन्स्ट्रक्शनच्या कंत्राटदारांनी**



**माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याशी बोलताना सांगितले आहे.**

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दोन दिवसापुर्वीच रस्त्यावर काम करणाऱ्या साकेत कन्स्ट्रक्शनच्या कंत्राटदारांशी चर्चा केली. सध्या शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या कामामुळे शहरातील व ग्रामीण भागातील नागरीकांना वाहतूकीस त्रास सहन करावा लागत आहे.हा रस्ता मुख्य रहदारीचा आहे.सध्या याचे काम ४० टक्के झाले आहे. ऐन पावसाळ्यात देखील हे काम सुरू आहे.त्यामुळे नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ लागला आहे,शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा हा फोर लाईन सिमेंट रस्ता असुन दोन्ही बाजूनी नाल्यासहीत काम होणार आहे.मात्र अजुनही ६० टक्के काम बाकी आहे. माजी मंत्री क्षीरसागर यांनी साकेतचे कंत्राटदार यांच्याशी संपर्क साधुन हे काम लवकरात लवकर पुर्ण करावे अशा सुचना दिल्या. त्यानुसार येत्या तीन महिन्यात हे काम पुर्ण करू असे आश्वासन दिले आहे. २४ किलोमिटर लांबीचा हा रस्ता असुन यात ६ पुलाची कामे असुन १६० कोटींचा हा रस्ता आहे.बीड शहरातून जाणार्या रस्त्याच्या लांबीत सहा किलोमिटर रस्ता काम होणार आहे.चौपदरी होणार्या या रस्त्यामुळे बीडचा हा भाग शहराच्या वैभवात भर घालणारा ठरणार आहे.तीन महिन्यात म्हणजे दिवाळीपुर्वीच या रस्त्याचे काम होणार असुन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

# प्रदीप कुलकर्णी यांना प्रतिलिपीचे प्रतिलिपी क्रिएटर्स प्रमाणपत्र प्राप्त

माजलगाव । प्रतिनिधी

प्रतिलिपीच्या वतीने आयोजित प्रतिलिपी क्रियेटर प्रोग्राम मध्ये सहभाग घेऊन टोपलीतले बाळ ही कादंबरी ५० भागांपेक्षा अधिक भाग प्रकाशित केल्याबद्दल माजलगाव जिल्हा बीड येथील संपादक तथा लेखक प्रदीप कुलकर्णी यांना प्रतिलिपी क्रिएटर्स म्हणून प्रतिलिपीच्या वतीने प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.

प्रतिलिपी चे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत सिंग प्रताप सिंग यांनी प्रदान केलेल्या या प्रमाणपत्रा मध्ये म्हटले आहे की, फेब्रुवारी २०२४ मध्ये आयोजित प्रतिलिपी क्रिएटर प्रोग्राम मध्ये सहभागी झाल्याबद्दल तुम्हाला प्रमाणित करताना आम्हाला अभिमान वाटत आहे ज्यामध्ये तुम्ही प्रतिलिपी प्लॅटफॉर्मवर पन्नास पेक्षा अधिक भागांची कथा मालिका यशस्वीपणे लिहून पूर्ण केली आहे तुमचे कथाकथना साठी चे समर्पण आणि वचनबद्धता खरोखरच प्रशंसनीय आहे प्रामाणिक प्रति लिपी क्रिएटर झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन . आम्हाला खात्री आहे की तुम्ही लेखक म्हणून उत्कृष्ट कामगिरी करत राहाल आणि तुमच्या सर्जनशीलतेने वाचकांना मोहित कराल.प्रतिलिपी क्रिएटर्स म्हणून प्रमाणपत्र





प्राप्त झाल्याबद्दल सहकारी लेखकानी प्रदीप कुलकर्णी यांचे सोशल मीडियाच्या माध्यमातून हार्दिक अभिनंदन केले आहे.

# कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची अत्यंत दुरावस्था; नागरिकांचे हाल! गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता डांबरापासून वंचित; नागरिक संतप्त

## आमदार लक्ष्मण पवार यांनी लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची पावसाळ्यात दुरवस्था झाली आहे. ४ किलोमीट अंतराचा रस्ता हा जीवघेणा बनला असून पावसामुळे रस्त्यावर चिखल होऊन दयनीय अवस्था झाली आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मार्गक्रमण करावे लागत आहे. मागील अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या या प्रमुख रस्त्याकडे कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांनी ताबडतोब लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित आहे. कोमलवाडी व भोजगाव ही ग्रुप ग्रामपंचायत असून या दोन्ही गावांना जोडणारा प्रमुख रस्ता आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या कसरतीने या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. ग्रामपंचायत भोजगाव येथे असल्यामुळे ग्रामस्थांना त्याठिकाणी जावं लागतं, सध्या पावसाळा सुरू असल्याने हा चार किलोमीटर अंतराचा रस्ता चिखलमय होऊन रस्त्यात खड्डेच खड्डे पडले असून वाहने चालवणे जिकिरीचे बनले आहे. तसेच नागरिकांना चिखलातून पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे. दळणवळणासाठी कोमलवाडी ते भोजगाव हा प्रमुख रस्ता असल्यामुळे येथील नागरिकांची नियमित या रस्त्यावर वर्दळ असते, ग्रामपंचायतीच्या कामासाठी, उमापूर येथील बँकेच्या कामासाठी, शेतात जाण्यासाठी तसेच इत्यादी महत्वपूर्ण कामासाठी कोमलवाडी येथील कोमलवाडी येथील नागरिकांना या रस्त्यावरून ये-जा करावी लागते. पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडले असून ते खड्डे



चुकविण्याच्या नादात तसेच गाडी घसरून अनेकवेळा नागरिक पडत आहेत. शेतकऱ्यांना, महिलांना या रस्त्यावरून दररोज मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीववित्वाला धोका निर्माण झाला आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य असून रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. चिखलामुळे वाहन घसरत आहे. वाहने फसत आहेत, या प्रकारामुळे या रस्त्यावर प्रवास करणारे नागरिक संतप्त झाले आहे. त्यामुळे या रस्त्यावर तात्काळ उपाययोजना करावे आणि गेल्या अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या रस्त्याला

### कोमलवाडी-भोजगाव रस्त्याची दयनीय अवस्था!

मागील काही वर्षांपूर्वी कोमलवाडी फाट्यापासून ते कोमलवाडी गावालगत रस्त्याचे अर्धवट डांबरीकरण झालेले आहे. कोमलवाडी ते भोजगाव या रस्त्याची दयनीय दुरवस्था झालेली आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सध्या काही मुरुम टाकून नागरिकांना येण्या जाण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. सदरील हा रस्ता डांबरीकरण करण्यासाठी आम्ही आतापर्यंत आमदार लक्ष्मण पवार यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. यापुढे देखील करणार आहोत. सदरील हा रस्ता डांबरीकरण होणारच आहे. परंतु लवकरात लवकर होण्यासाठी प्रयत्न करणार

– सुर्यकांत धनवडे, उपसरपंच कोमलवाडी



**आज मुंबई येथे महावितरण चे संचालक अरविंद भादीकर सर यांची भेट घेऊन बीड शहर चे विविध एम एस ई बी च्या विषयावर चर्चा झाली . चर्चेनंतर महावितरण चे संचालक अरविंद भादिकर सर यांचा बीड जिल्ह्याच्या वतीने सत्कार केला . यावेळी सत्कार करताना संभाजी भैय्या सुर्वे , मोहम्मद अझरुद्दीन ए एस गोलू उपस्थित होते.**

# मनस्विनी महिला प्रकल्प द्वारे जहांगीरमोहा धारूर येथे महिला व मुलींचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील जहांगीरमोहा या गावामध्ये मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्था व एस आर टी ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय अंबाजोगाई यांच्या सहकार्याने महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली या शिबिराचे उद्घाटन जहांगीर मोहाच्या सरपंच आशाताई कांदे , पोलीस पाटील मुक्ता मंदे व प्रा .अरुंधती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले .

जहांगीर मोहा हे धारूर तालुक्यातील डोंगरात अडवळणाला



असलेले गाव आहे. ९० % पेक्षा अधिक लोक ऊस तोडीला दरवर्षी जातात .या गावांमध्ये अनेक महिलांचे गर्भ पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया झालेली आहे. गाव आडवळणाला असल्याने महिलांच्या अनेक आरोग्य विषयक तक्रारी या सहजपणे सोडवल्या जात नाहीत. याची दखल घेऊन मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने व महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत एस आर टी वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने हे मोफत शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिरासाठी शासकीय दवाखान्यातून १३डॉक्टर्स ची टीम आली होती . या शिबिरात वैद्यकीय तपासणी व मोफत औषध उपचार करण्यात आले सव्वातीनशे पेक्षा अधिक महिलांचे आरोग्य तपासणी याद्वारे करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुंधती पाटील यांनी केले


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT